# प्रकरण पाचवे

# ‘उनसावली’ व ‘सांजरंग’ आशय अभिव्यक्ती विचार व वाङ्मयीन रसास्वाद

# प्रकरण पाचवे

# 'उनसावली 'सांजरंग' आशय अभिव्यक्ती विचार व वाङ्‌मयीन रसास्वाद

मागील प्रकरणातून नामदेव चं. कांबळे यांच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन कादंबऱ्यातील कथानक, व्यक्तिचित्रणे, आशयविचार पाहिला प्रस्तुत प्रकरणात वरील दोन कादंबऱ्यातील आशय अभिव्यक्तीचा विचार करावयाचा आहे. नामदेव कांबळे यांच्या कादंबरी लेखनाने दलित कादंबरी क्षेत्रात मोलाची भर टाकली आहे. त्यांनी जे जीवन जगले, भोगले, अनुभवले व पाहिले ते अत्यंत प्रामाणिकपणे प्रांजळपणे आपल्या कादंबरी लेखनातून मांडले आहे त्यांचा अनुभव अत्यंत दाहक, विलक्षण व तितकाच कडवट असून तो त्यांनी कलात्मक पध्दतीने रेखाटला आहे. त्यांच्या लेखनात कुठेच आक्रस्ताळेपणा, अभिनिवेश व संताप जाणवत नाही. त्यांनी अत्यंत संयमाने आपले अनुभव मांडले आहेत.

**'उनसावली' 'सांजरंग' आशय अभिव्यक्ती विचार व वाङ्‌मयीन रसास्वाद :-**

नामदेव कांबळे यांनी 'उनसावली' मधून जिद्दिने शिक्षण घेणाऱ्या मांग समाजातील तरुणाची कथा रंगविली आहे. तर 'सांजरंग'मधून मांग समाजाचे दु:ख, दारिद्रय, मांग समाजाचा शोषण मुक्तिसाठीचा लढा याचे चित्रण आले आहे. या कथानकाबरोबरच कांबळे यांनी दलित समाजातील नव जागृतीबरोबरच मांग समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, त्यांची चूकीची जीवन पध्दती, यामुळे मांग समाज दु:खाच्या खाईत कसे जीवन जगत आहे. याचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे. तसेच दलित समाजातील दोन जातीचे आपआपसातील ताण-तणाव, हेवेदावे, द्वेषमत्सर, त्याचबरोबर धार्मिक, राजकीय संघर्ष यांचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रणही त्यांनी या कादंबरीत केले आहे. नामदेव चं. कांबळे यांनी या दोन कादंबऱ्यातून मांडलेला विचार, दलित जीवनाचे केलेले सुक्ष्म चित्रण अत्यंत लक्षणीय आहे.

दलित समाजाचे चित्रण या कादंबऱ्यामधून आल्याने प्रकाशक आणि कादंबरीकार यांनी या कादंबऱ्यांना 'दलित कादंबरी' म्हटले आहे. पण दलित साहित्यात नकार, विद्रोह, परिवर्तन, विज्ञाननिष्ठा यांना महत्व दिले जाते. ही आग्रही भूमिका कादंबरीकाराला मान्य नाही. 'मांग जात' ही दलित जात असून

मांग समाजाचे केलले चित्रण हे दलित साहित्यच होय अशी कादंबरीकाराची भूमिका आहे. या विषयी लेखक म्हणतो, ''वालंबी, रघू, सिताराम, कौशीचे हे कथानक मातंग जातीची कथा आहे मातंग जात दलित असल्याने ही दलित कादंबरी ठरते. दलित साहित्यात नकार, विद्रोह, परिवर्तन, विज्ञाननिश्ठ असावी अशी आग्रही भूमिका त्या साहित्याच्या संबंधाने मांडली जाते. दलित साहित्याची चतु:सूत्री 'राघववेळ' मध्ये येत नाही. हा आक्षेपच तिचे बलस्थान ठरला असावा ''[१]

नामदेव कांबळेंच्या कादंबरी लेखनात येणारा नकार, विद्रोह दलित साहित्याप्रमाणे ठळक, चटकन नजरेत भरण्यासारखा नाही. याविषयी किशोन सानप लिहितात, ''नामदेव कांबळेंच्या कादंबऱ्यांत दलित साहित्यातील नकार, विद्रोह, परिवर्तन आणि विज्ञाननिष्ठा चलनी नाण्यासारख्या वापरल्या जात नाहीत. अत्यंत समंजसपणे आणि संयतपणे त्यांच्या कादंबऱ्यातील कथानक आणि माणसे कथानकाचा अवकाश भरुन काढतात. विचारांची दिशा संयमाने सूचित करतात. म्हणूनच त्यांच्यावरील आक्षेपाचे 'बलस्थान' त्यांना जाणवलेले दिसते. दलित साहित्याने नामदेव कांबळेंच्या कादंबऱ्या स्वीकारल्या की नाही, हा प्रश्न त्यामुळे गौण ठरतो. प्रकाशकाला आणि लेखकालाही दलित साहित्यातच ह्या सर्व कादंबऱ्यांचा समावेश व्हावा, असा आग्रही दृष्टिकोन बाळगण्याचे कारण नाही. दलित साहित्य ही मराठी साहित्यातील एक वर्गवारी आहे. मराठी ते व्यवच्छेदक लक्षण नाही. नामदेव कांबळेंच्या कादंबऱ्यांना दलित कादंबरी ठरवले म्हणजे त्या मोठ्या होतील किंवा नामदेव कांबळे हा दलित साहित्यातील मोठा लेखक ठरेल असेही समजण्याचे कारण नाही.''[२]

दलित जीवन जाणिवांचा वेध घेण्याच्या दृष्टीने 'उनसावली' 'सांजरंग' या दोन कादंबऱ्या साहित्यक्षेत्रात लक्षणीय ठरल्या आहेत. 'उनसावली' या कादंबरीत डायरीच्या तंत्राचा रघूच्या मानसिक आंदोलनाशी सांधा जोडला जातो. 'उनसावली'त रघूचा विकासक्रम कळतो. तर 'सांजरंग' या कादंबरीत सामाजिक समस्याच्या आकलनासाठी डायरीचा वापर होतो. मानवी जीवनातील ताणतणाव, तात्वीक मतभेद, ग्रामीण जातीयता, दोन समाजातील तणाव या कादंबऱ्यामधून दिसून येतात.

**रघूचे रोजनिशी लेखन : –**

रोजनिशी लेखन हे आत्मनिवेदनपर असते ''रोजनिशी लेखनात विशिष्ट प्रसंगामुळे वा घटनामुळे मनावर झालेले आघात ते पात्र त्या क्षणीच नोंदवून ठेवीत असल्यामुळे त्या प्रकटीकरणाला एक प्रकारची धार येते.''[३] असे बापट गोडबोले यांनी म्हटले आहे.

मराठी कादंबरी लेखनात अनेक कादंबरीकारांनी रोजनिशी लेखनाचा वापर केलेला दिसून येतो. कादंबरी लेखनात अधूनमधून डायरी स्वरुपाचे लेखन महत्वपूर्ण असते. याबाबत बापट गोडबोले म्हणतात, ''दैनंदिनीच्या स्वरुपात कादंबरी लिहिली गेल्यास तिचे स्वरुप फारच संकुचित होते. पण दैनंदिनीचा थोडासा उपयोग केल्यास तो मात्र तंत्रदृष्ट्या फार आकर्षक होतो.''[४]

नामेदव कांबळे यांनी आपल्या कादंबरी लेखनात रघूच्या डायरी लेखनाचा वापर केला आहे. डॉ. आशा सावदेकर म्हणतात, ''रघूची डायरी हे आत्मशोधाच्या वाटेतील आत्मसंवादी चिंतनाचे विलोभनीय रुप आहे.''[५]

वसारी सोडून पुसदला आल्यानंतर कॉलेज जीवनात व नंतर कालखंडात अनेक प्रसंगी मनावर झालेल्या आघातातून रघू डायरी लेखनाकडे वळतो. तर कधी रघूच्या मनात संघर्ष निर्माण झाल्यानंतर तो डायरीतून व्यक्त करत राहतो. हा त्याचा आत्मशोध आत्मसंवाद ठरतो. 'उनसावली'च्या कथानकात वसतिगृहाच्या वास्तव्यात गुंफाशी बोलल्यामुळे तिच्याबरोबर आजारी सारजा मावशीला बघायला गेल्यामुळे मुले रघूवर शंका घेतात, त्यावेळी झालेले डायरी लेखन – त्याचे निरागसपण व्यक्त करते.

''कशी असतील मुले तरी ? आपण गुंफा सोबत गेलो तरीही काही बाही विचारतात. बरे झाले रात्री जाण्याचा तिचा प्रस्ताव आपण टाळला ते ह्येट ! कशाचे बरे अन कशाचे वाईट. कधीही गेलो असतो आपण तरी मुले बोलणारच होती. जात येत नसतात का पण ? मुलीशी बोलणे, तिच्या सोबत कुठे जाणे, ते ही कामानिमित्ताने जाणे म्हणजेच तिच्याशी मुलाचे काही तरी असते का ? त्याचा तसा हेतून तरी असतो असेही म्हणता येते का ? ह्येट ! मनाचा निर्मळपणा, निर्मळ मनाचा निर्मळ संबंध कोणीच कसे विचारात घेत नाही ? आपण मावशीला भेटायला गेलो तिच्या सोबत. रस्त्याने एवढे तेवढे बोललोही नाही. तेव्हा आपल्या

मनात काही होते का ? नव्हते आताही नाही. गुंफाच्या मनात तरी आपल्याविषयी काही असेल ? काय सांगावे ? असेल नसेलही. तिचे कसे सांगता येईल ? नसेल पण.''[६] ही डायरीतील मनोगत रघुच्या बालसुलभ व तारुण्यसुलभ भावनाचा उत्कट आविष्कार प्रकट करते.

''आपल्या आजारपणात देवकाते कुटुंबियांनी खूप केले आपले, आत्मीयतेपोटीच केले असावे. सरांनीही शिकवणी न करता पैसे दिलेत आपल्याला. ते ही आत्मीयतोपोटीच. आत्मीयता? कशाला म्हणतात आत्मीयता? एखाद्या विषयी वाटणारे उत्कट प्रेम म्हणजे आत्मीयता. अशा प्रेमातून व्यक्ती हवीहवीशी वाटणे म्हणजे आत्मीयता. व्यवहार म्हणजे काय मग ? देण्या-घेण्याचा हिशेब म्हणजे व्यवहार. गरज पडेल तेव्हा घेणे अन् घेतलेले परत देणे म्हणजे व्यवहार. एखाद्यासाठी काही तरी करणे, कुठल्या तरी स्वरुपात केल्याची त्याची परतफेड करुन घेणे म्हणजे व्यवहार.''[७] तर 'उनसावली' कादंबरीमधील हे डायरी लेखन रघूच्या विचारी वृत्तीचे दर्शन घडविते. वसारीत १४ एप्रिलला आंबेडकर जयंती साजरी केली जाते. रघूची तीव्र इच्छा असूनही मांगांच्या संकुचित वृत्तीमुळे रघूला या मंगल प्रसंगी घराला तोरण बांधता येत नाही. जयंतीच्या कार्यक्रमात तो आपले विचार मांडतो. मात्र तो मांग जातीचा असल्यामुळे त्याला उपरा म्हणून हिणवले जाते. निराश झालेला रघू डायरी लेखन करतो. यातून त्याचे प्रगल्भ विचार स्पष्ट होतात.

''काय चुकले आपले. कोणताही थोर पुरुष मूठभर समाजालाच आपले मानत नाही. हे ? बाबांच्या जयघोषावर तरुन जायचा काळ संपला. हे ? जयघोषापलिकडे उभे असलेले बाबा आपण समजून घ्यायला हवेत. हे ? छे ! सत्यच तर सांगत होतो आपण. सत्य सांगायचे नसते ? बोलायचे नसते का सत्य? सत्यमेव झोंबते. सत्य रुचत नसते. पचत नसते. बौध्दांना तरी ते आज रुचले नाही. पचलेही नाही. नसेलच रुचत त्यांना. का पण ? आपण सत्य बोलतो म्हणून ? मांग असूनही आपण बोललो म्हणून ? मांगांना तरी बाबा रुचतात ? नाहीत रुचत. ते बौध्द म्हणून की नाही ? म्हणूनच.

दलितांतील ही दरी मिटणार नाही कधी ? बाबांच्या नावावर तरी मिटणार नाही का ? आपण हिंदू धर्मीय, आपली हिंदू मानसिकता म्हणून बाबांचे नाव घ्यायचा, त्यांच्या विचारावर भाष्य करायचा अधिकार नाही आपल्याला ? त्यांच्या विचारानुसार वागुनही ? का असे शाहू महाराज हिंदू होते, ज्योतिबाही हिंदूच होते ते का चालतात बौध्दांना? त्यांच्या पुरोगामी विचारांमुळेच ना ? विचार तर कोणाचेही घेता

यावेत. त्याची चिकित्साही करता यावी. तिथे जात, पंथ आड येता कामा नये. पण येतो मात्र. माणसाच्या मानगुटीवर बसलेले हे जाती, धर्माचे भूत उतरणार नाही का कधी ? कधीच उतरणार नाही का ?''[८]

या रघूच्या डायरी लेखनातून त्याची सामाजिक जाणीव व वैचारिक द्वंद्व स्पष्ट होत राहते. एखाद्या घटनेतून निर्माण झालेली प्रश्नांची मालिका तो डायरीत नोंदवतो. कादंबरीतील डायरी लेखनांतून रघूच्या मानसिक व वैचारिक आंदोलनावर प्रकाश टाकला आहे त्यातून उमटलेल्या प्रतिक्रिया रघूचे रुप व्यक्त होत राहते.

रघूचे व्यक्तीचित्रण विलक्षण बोलके आहे. डॉ. बाबासाहेबांच्या बाबतीत त्याने व्यक्त केलेले विचार त्याचे वैचारीक मोठेपण व्यक्त करतात. 'यंत्रे क्रांती करीत नसतात तर विचारांनी भारलेली माणसेच क्रांती घडवून आणतात. दलित वर्गाची अस्मिता जागृत करुन त्यांच्यामध्ये वैचारिक क्रांती घडवून आणणारा महामानव म्हणजे डॉ.आंबेडकरच'[९] असे भालचंद्र फडके यांचे विचार रघूच्या व्यक्तीचित्रणातून प्रतित होतात. दलितांच्यात आत्मसन्मान, आत्मविश्वास, आत्मवलंबन बाबासाहेबांनी निर्माण केल्याची जाणीव रघूला मनोमन झालेली होती. उघड बोलण्याचे धाडस त्याला झाले नाही म्हणून त्याने आपले मन डायरी लेखनात व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. डायरी लेखनातून रघूचे धडपडणारे अस्वस्थ मन प्रकट होते.

**भूक सूक्ताचा विचार :-**

भूक ही जीवमात्रांची आदिप्रेरणा आहे. तीच जर नसती तर सृष्टीचं जीवनचक्र चाललं नसतं. 'जीवो जीवस्य जीवनम्' हे भूकेचं सूत्र असून, या सूत्रानंच जीवसृष्टीची भूक भागत असते. नामदेव कांबळे यांच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन्ही कादंबरीतून माणसाची भूक व्यक्त झाली आहे त्यातून भूक सूक्ताचा विचार मांडता येतो. कादंबरीचे जणू हे मुख्य सूत्रच ठरले आहे. भूक ही तीन प्रकारची असते. पहिली पोटाची भूक. दुसरी कुडीची आणि तिसरी ज्ञानाची भूक. या संदर्भात किशोर सानप म्हणतात, ''मानवी जीवनाकडे सकारात्मक पाहणाऱ्याच्या दृष्टीने या तीन भुका महत्वाच्या ठरतात पोटाची भूक भागवण्यासाठी माणसाला श्रम करावे लागतात. कुडीची भूक भागण्यासाठी सामाजिक आणि सांस्कृतिक नीतिनियमांचे पालन करावे लागते. ज्ञानाची भूक भागविण्यासाठी शिक्षणाची कास धरावी लागते. पोटाची

भूक आणि कुडीची भूक तर भागवता येईल. परंतु ज्ञानाची भूक भागवण्यासाठी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक वारशाची गरज असते ''[१०]

**पोटाची भूक :-**

पोटाची भूक मानवाला नेहमीच असह्य करीत असते. त्यात दलितांच्या जीवनात ही भूक अधिक वाट्याला येत असते. दलित साहित्यातून पोटाच्या भूकेचे चित्रण अनेकदा घडविले गेले आहे. नामदेव कांबळे यांनी ही आपल्या कांदबरी लेखनातून पोटाच्या भुकेने तडफडणाऱ्या कुटुंबाचे दु:ख बोलके केले आहे. या कादंबरीतील वालंबी हरणीसारख्या स्त्रिया पोटाची भूक भागवण्यासाठी दुसऱ्याच्या शेतावर कष्ट करीत राहतात. तर कधी पोटाची भूक भागवण्यासाठी दलित स्त्रियांना अब्रूवर घाला पडणाऱ्या प्रसंगाला सामोरे जावे लागते. तर पायरुला हीच पोटाची भूक भागवता यावी म्हणून वामन भोजाजीच्या म्हाताऱ्या आईच्या मृत्यूची बातमी सांगण्यासाठी जीव धोक्यात घालावा लागतो. तर लहान सीतारामला वाघ बनून भीक मागत नाचावे लागते.

दिवाळीचा सण जवळ आला असताना, घरात खायला काही नाही म्हणून वालंबी आणि सीताराम उडीद आणण्यासाठी जातात तेव्हा वालंबीला गोम चावते. वेदना तिला असह्य होतात. त्यावेळी वालंबी म्हणते, 'देवा ऽ कशी रे ही जिनगी ही ? पोटाच्या हुळआगी पायी लेकरासाठी करायले गेली काय आन् झालं काय ? काय वेदना तरी हातात. अंगात इस्तो भरला जणू.''[११]

पोटाची भूक भागवण्यासाठी वालंबी अनेकांच्या शेतावर रोजाने, हिश्याने काम करीत राहते. सोना बुध्दाचा उडीद दहाव्या हिश्याने तोडून देताना, फुटलेल्या शेंगाचे दाणे गाठोड्यात न बांधता बाईच्या ओटीपोटाकडे कोणी लक्ष देत नाही म्हणून ती ओटी पदरचा घोळ करुन त्यात उडीद गोळा करते. त्यातून अधिक उडीद मिळवण्याचा प्रयत्न करते.

पोटाची भूक भागवण्यासाठी म्हाताऱ्या दगडू आबाला दोनदा कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन करावे लागते. एकदा सरकारी योजना म्हणून पोलिसांकडून जबरदस्तीने ऑपरेशन होते. तर दुसऱ्यांदा पैशासाठी तो ऑपरेशन करुन घेतो आणि गरीबीसाठी ऑपरेशन केलेल्या दगडू आबाची गरीबीच जीव घेते. योग्य प्रकारे पोटाची भूक न भागल्याने दगडू आबा मरण पत्करावे लागते.

पोटासाठी दारुचा धंदा करणारा सुदामा पोलिसांकडून मार खाल्ल्यानंतर झारेकरी होऊन गावोगावच्या स्मशानभूमीत जाऊन तेथील राख चाळत राहतो आणि त्यातून मिळालेल्या सोन्याच्या पैशातून पोटाची भूक भागवतो. त्याला खोल पाण्यात उतरुन रेती चाळत असताना त्याला अर्ध्या एक तासानंतर चांदीचे जोडवे सापडते आणि दुसऱ्या जोडव्याचा शोध घेण्यासाठी तो कितीतरी वेळ नदीचा गाळ शोधत राहतो. मात्र दुसरे जोडवे सापडत नाही ''दुपार टळत आली. परंतु सुदामाला दुसरे जोडवे सापडेना हातचे कामही त्याला टाकवेना. पोटात भूक मावत नव्हती. कितीतरी वेळ तो गाळ चिवडीत सुटला. परंतु जोडवे सापडायचे नाव नाही.''[१२] या निवेदनातून कादंबरीकाराने सुदामाची अगतिकता स्पष्ट केली आहे.

**शरीराची भूक :–**

कुडीची म्हणजेच शरीराची भूक ही माणसाच्या भावनेशी संबंधित असते. कुडीची भूक भागण्यासाठी सामाजिक आणि सांस्कृतिक नितीनियमांचे पालन करावे लागते.

शरीराची भूक व्यक्त करताना नामदेव कांबळेंची भाषा अधिक मितभाषी आणि सूचक झाली आहे. शरीराच्या भूकेची मागणी संयमाने आणि अतिशय सूचक अशा बोलीभाषेत कादंबरीकाराने व्यक्त केली आहे.

'वालंबी' ही या कादंबऱ्यांतील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहे. ऐन उमेदीच्या काळातच ती विधवा झालेली असून सुध्दा आपल्या शरीराची भूक मारते आणि स्वत:चे शील जपण्याचा प्रयत्न करीत राहते. नैतिकता आणि स्वाभिमान तिला व्यभिचार करु देत नाही.

मांगांच्या स्त्रिया ह्या भोग वस्तूच आहेत अशीच वसारी गावात मनोभूमिका असते. गावातील हरणी, वालंबी यांच्या स्त्रीत्वावर डोळा ठेवून असणारा गोपाळराव देशमुख आपली बायको दोन दिवस बाहेर गावी गेली असल्याचे निमित्त साधून हरणीला काशा काढण्याची मंजूरी देतो पण घरी चल असे सांगतो. पण हरणीला अब्रूवर घाला घातला जाणार आहे हे लक्षात येताच ती सावध होते. हरणी आपल्या जाळ्यात सापडली नाही तेव्हा गोपाळराव देशमुख वालंबीला जाळ्यात पकडण्याचा प्रयत्न करतो.

''घरा लोक चाला न.''

''कशाले ?''

''माडीवर जाऊन जाळं झटकायचं व्हते. काशा न्हाव द्या आजच्या दिस.''

क्षणभर ती काहीच बोलली नाही. तिला वाटू लागले जावावं का गोपाळरावाच्या वाड्यावर ? मजूरी तर देईलच. काशा काय उद्या बी येचता येतीन.

मनाचा अर्धानिर्धा निर्णय करुन तिने विचारले, ''बाई आसतीन न घरी?'

''तीच तर आडचण ह्ये. गावाले गेली ती दोन दिसांपसून.''

तो मधाळ हसला. वालंबी समजायचं ते समजली. लगेच सावरुन म्हणाली, ''जाळ काय जातं पळतं ह्ये का, भावजी ? बाई आल्यावर बी काढता येईन. रानातली कामं मातर येळच्या येळी व्हयले पाह्यजे कानी .''[१३] असे सांगून वालंबी अशा बिकट प्रसंगी आपला तोल ढळू देत नाही. वासना ही मानवाची आदिम भावना असताना ही वालंबी वासनेवर विजय मिळवून मानाचे स्थान मिळवते. वैधव्यातही पातिव्रत्य शाबूत ठेवण्याचा वालंबीचा प्रयत्न तिच्या नितीमान चारित्र्यावर प्रकाश टाकतो. युक्ती प्रयुक्तीने देशमुखाच्या वाड्यावर वालंबी जाण्याचे टाळते.

दलित स्त्री म्हटले की ती दारिद्रयाने खचलेली, असहाय झालेली स्त्री, मुलांबाळासाठी आपल्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणारी स्त्री आपणास दलित वाङ्मयात चित्रित केलेली आढळते आणि अशी ही असहाय दलित स्त्री आपले मन जाळून, दगड बनवून, गावच्या पाटलाच्या, जमिनदाराच्या वाड्यावर अथवा शेतावर जाणारी आणि बलात्कार निमूटपणे सोसणारी स्त्री दाखविली जाते. परंतु नामदेव कांबळेंच्या कादंबरीतील स्त्री तशी नाही. तर ती कोठे अन्याय होणार हे जाणून घेणारी स्त्री चित्रीत केलेली असते त्यांनी जीवनाच्या भीषण दाहकतेचा ठाव घेणारी स्त्री रंगविलेली असते. नामदेव कांबळे यांच्या कादंबरीतील पात्रे नितीमान आहेत. नितीसाठी प्राण देणारी, त्याग करणारी पात्रे ते चित्रीत करण्यात ते सिध्दहस्त आहेत हेच खरे.

सीताराम यसोंत्याच्या बायकोला लिलाला रिठदहून वसारीला घेऊन येताना वाटेत निर्जन जागेत तिच्या मनात शरीरसंबंधाची ओढ निर्माण होते आणि सितारामकडून ती शरीरसुखाची अपेक्षा करते. सिताराम बरोबरचे नाते लक्षात न घेता ओढ्याच्या घळीत जाऊन काटा लागल्याचे निमित्त करुन स्त्री देहाचे सितारामला दर्शन घडवते.

''झंपरची दोन तीन बटणे निघालेली. छे! तिनेच छिद्रावेगळी केलेली. त्यातून तिचे अर्धेअधिक उरोज स्पष्ट दिसू लागले डोक्यावरचा पदर खांद्यावरुन ही खाली घसरलेला कासोटा मोकळा केलेला. सावलीला घळीत ती उभी. सगळा उन्हाळा डोळ्यात साठवून.''[१४]

अशा वर्णनातून लिलाची शरीर भूकेची आसक्ती कादंबरीकार चित्रित्र करतो. शरीराची भूक माणसाला विचारापासून दूर घेऊन जाते विचारावर भावना विजय मिळवते हेच स्पष्ट होते एकांतात देहप्रदर्शन केलेल्या लीलाच्या वासनेला चारित्र्यवान सिताराम बळी पडत नाही.

अशी ही चारित्र्यहीन लीला वासनेच्या भूकेने अंध होऊन परपुरुषाबरोबर संबंध ठेवण्याचा प्रयत्न करते व माहेरच्या बौध्द समाजातील कान्नूबरोबर घरातून पळून जाते

भारतीय परंपरेत स्त्री-पुरुषांच्या विवाहोत्तर वैध संबंध आणि विवाहबाह्य अनैतिक संबंध हे दोन संबंध लेखकाने मोठ्या सूचकतेने रेखाटले आहेत.

**ज्ञानाची भूक :-**

ज्ञान ही अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीन मूलभूत गरजांइतकीच महत्वाची गरज आहे. दलित समाजाला फुले आंबेडकरी विचारातून नवे आत्मभान आल्यामुळे तो ज्ञान घेऊ लागला. आंबेडकरांनी दलितांना 'शिका आणि संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे मार्गदर्शक सूत्र दिले

'उनसावली' या कादंबरीची सुरुवात रघू प्रचंड जिद्द बाळगून ओढाताणीत मॅट्रिकची परीक्षा पास होऊन आपले खेडे सोडून कॉलेजच्या शिक्षणासाठी पुसदला येतो अशा कथानकाने होते. त्याच्या खेड्यापेक्षा तिथले वातावरण, कॉलेज, ग्रंथालय आणि त्याला भेटणारी सुशिक्षित, सुसंस्कृत माणसे हे सर्व घटक रघूच्या बौध्दीक आणि मानसिक विकासासाठी अतिशय अनुकूल ठरतात. रघूची वाढलेली ज्ञानाची भूक या वातावरणात क्षमत जाते. त्याचे अनूभव विश्व जसे विस्तारत जाते तशी बौध्दीक क्षमताही विकसित होत जाते. कॉलेज, शिक्षणपध्दती, राजकारण, दलित आंदोलन याचे प्रत्यक्ष अनुभव त्याला मिळत जातात.

या सर्व गोष्टींबरोबर रघू वाचन ही करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुस्तकांचे वाचन त्याच्याकडून केले जाते. त्यांचे विचार त्याला आदर्शवत वाटत जातात. त्यातून

त्याचे स्वत:चे विचार बनत जातात. प्राचार्य साहेबांच्या बरोबर तो प्रसंगी वैचारीक चर्चा करतो. सहा डिसेंबर, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी महाविद्यालयातील रिपब्लीकन यूथने आयोजित केलेल्या परिसंवादात रघू आंबेडकरांच्यावर वैचारिक स्वरुपाचे भाषण करतो. तर आंबेडकर जयंतीला आंबेडकरांच्या कर्तृत्वाने भारावलेला रघू भिमजयंती साजरी करायचे ठरवतो. व चिंतनशिल स्वरुपाचे भाषण करतो. नामदेव कांबळे यांनी रघूच्या माध्यमातून दलित तरुणाच्या ज्ञानाची भूक विशद केली आहे

बी.ए. ची पदवी मिळविलेला रघू पुसदच्या फुलसिंग नाईक महाविद्यालयात कारकून म्हणून नोकरीस लागल्यानंतर तिथेच शिक्षण न थांबवता पुढे एम.ए.बी.एड. करतो. आपला भाऊ सीताराम यालाही पुढील शिक्षणासाठी पुसदला घेऊन येतो नंतर नंदा ही डी एड. करुन शिक्षिका होते. सीतारामला वसारीला नोकरी लागते. वालंबीची दोन्ही मुले व सून शिकून नोकरी करतात. वालंबीलाही आपल्या मुलाने शिकावं, मुलांच्या नशिबी तरी मांगांचं मागतेपण येऊ नये असे वाटते.

विद्येचे महात्म्य म.जोतिराव फुले यांनी आपल्या अखंडात मांडले आहे,

> ''विद्येविना मती गेली। मती विना नीती गेली ।।
> नीती विना गती गेली । गती विना वित्त गेले ।।
> वित्ता विना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

हा जोतिबा फुले यांच्या शिक्षणविषयक तात्विक विचार होता. शुद्रांच्या वाट्याला ज्ञान आले नाही. म्हणून त्यांच्या जीवनात अनर्थ घडला. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. फुल्यांचा हा विचार आपल्या कृती आणि उक्तीतून मांडला म्हणूनच दलित समाजाच्या वाट्याला ज्ञानाचे अमृत आले

नामदेव कांबळे यांनी वालंबीच्या कुटुंबातील मुलांच्या रुपाने ज्ञानाचे सूक्त गायले आहे. दलितांचे होणारे शोषण, अन्याय, दारिद्रय, मुस्कटदाबी ह्यातून बाहेर पडायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. हा महत्वाचा विचार कादंबरीचे परिमाण ठरले आहे. विद्या नसली ती माणसाची मती कुंठित होते. नीतिमत्ता ढासळते. आज बहुजन समाज शिक्षणामुळेच आपली प्रगती करु शकला आहे. डॉ.बाबासाहेबांनी दाखविलेली दिशा लक्षात घेऊन 'शिक्षण प्राप्ती' हे ध्येय मानून शिकणारा रघू हा दलित तरुणांचा आदर्श ठरला आहे.

**दलितांच्या दु:ख–दारिद्रयाचे चित्रण :–**

जन्मजात अस्पृश्यतेमुळे दलितांच्या वाट्याला अनेक दु:खे आलेली आहेत. दलित माणसाला येथील समाजव्यवस्थेने सामाजिक–सांस्कृतिक जीवनापासून वंचित ठेवले आहे. दलितांकडून श्रम घेऊन त्याला मात्र उत्पादनच्या साधनापासून दूर ठेवले गेले आहे. त्यामुळे दलितांच्या वाट्याला सतत दु:ख दारिद्रयताच आली याचे चित्रण नामदेव चं. कांबळेंनी आपल्या कादंबरीतून घडविले आहे.

चातुर्वण्य व्यवस्थेमुळे दलितांच्या वाट्याला आलेले दु:ख 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन कादंबऱ्यातून व्यक्त होत राहते. जातीने दलित मांग असल्यामुळे गावकीच्या कामाचा एक भाग म्हणून पायरुला वामन भोजाजीच्या आईच्या मृत्यूचा सांगावा धेऊन पावसाच्या दिवसात जावे लागते

'उनसावली' मध्ये वालंबी उडीद उफनायला गेल्यावर तिला गोम डसते. तिला असह्य वेदना होतात. थंडी वाजून येते. ताप भरतो. वालंबीची ही अवस्था पाहिल्यावर सितारामला आपल्या दारिद्रयाची किव येते ''काय मायचीडत ही दलिंद्री तरी. पोटाचे आणीसाठी काही करायचले जावावं तर घर पुसत काही बी येते माघं. चांगली सुडी उपनत व्हती न माय. पण गोमच डसावं का तिले ? सगळा हात सुजला हिंव वाजून तापस आला. पडली कण्हत.''[१५]

'सांजरंग'च्या उत्तरभागात पुरोगामी विचाराने झपाटलेला मांग समाज गावकीचे प्रतिक असलेले 'डफडे' फोडून टाकतो. त्यातून त्यांची विद्रोहाची जाणीव व्यक्त होते. मात्र पोटासाठी परत त्यांना महागीचा बॅंड शिल्लक ठेवाचा लागतो. यसोता पोटासाठीच जगदीशच्या फसवणूकीचा बळी ठरतो व परत गावकी स्विकारतो. डफडे मढवतो याचे कारण यसोता दारिद्रयाचा बळी ठरतो.

आणिबाणीच्या काळात पोलिसांच्याकडून जबरदस्तीने ऑपरेशन झालेला दगडू आबा सरकारी योजनेचे पैसे मिळावे म्हणून पुन्हा एकदा ऑपरेशन करुन घेतो आणि म्हातारपणात दारिद्रयाचा बळी ठरतो.

**दलित स्त्री दु:खाचे चित्रण :–**

दलित साहित्यातून दलित समाजाचे दु:ख प्रवाहीत झाले आहे. मात्र या समाजातील दबलेल्या स्त्रीला न्याय मिळालेला नाही.

'उनसावली' आणि 'सांजरंग' या दोन्ही कादंबऱ्यातून दलित समाजातील स्त्रियांच्या दु:खाचे चित्रण आले आहे. कादंबरीकार दलित स्त्री दु:खाची कळ अनेक प्रसंग व घटनातून मांडण्यात यशस्वी ठरले आहेत.

या संदर्भात दत्ता भगत म्हणतात, ''नामदेव यांनी ही कादंबरी हरिभाऊ आपटे यांच्या मालिकेतील एक चांगली कादंबरी व हरिभाऊंच्या आदर्शापर्यंत येऊन विसावणारी कादंबरी आहे. असेच म्हणावे लागेल.''[१६] कारण थोर कादंबरीकार ह. ना. आपटे यांनी आपल्या कादंबरी लेखनातून तत्कालीन स्त्री दु:खाचे चित्रण घडविले होते. त्याप्रमाणे कांबळे दलित स्त्री दु:ख व्यक्त करतात. ग्रामीण दलित समाजातील स्त्री ही नखशिखांत दारिद्रय, अज्ञान, रुढी, अशिक्षितपणा, श्रम, शारीरिक व मानसिक शोषण यांचे बळी झाली आहे. अशा आशयाचे चित्रण या कादंबऱ्यांतून घडते दलित समाजातील स्त्री ही उच्चभू समाजातील माणसांच्या वासनेची शिकार बनत असते. अशा स्त्रिया शेतावर मोलमजूरीची कामे करताना त्यांना अगतिक होऊन अथवा जुलूम जबरदस्तीने शरीरसंबंधासाठी प्रवृत्त केले जाते. वसारी गावात हरणी व वालंबी यांच्या स्त्रीत्वावर डोळा ठेवणारा गोपाळराव देशमुख अशा खलप्रवृत्तीचा व्यक्त झाला आहे आपली बायको परगावी गेल्याचे निमित्त साधून तो हरणी वालंबीला आपल्या वासनेची शिकार बनवू पाहतो.

''घरालोक चाल बरं''

''कशाले ? काही काम ह्ये का ?''

''हो न, कामच ह्ये. तुही जाऊ गेली गावाले. वाशीमच्या साडणीला पोरगं झाले. पाह्यले गेली दोन दिसांपासून, पत्ता नाही अजून.''

''मंग?''

''तू चाल तरी खरी''. म्हणत तो मिशाळ हसला.

''काशाले जायचं व्हतं, काशिबा लाघाच्या.''

''जाव देन तिकडं त्या काशा न फाशा. घरीच ऱ्हा आजच्या दिस मी देतो तुही मजूरी भरुन काय?'' असे म्हणून गोपाळराव देशमुख हरणीला फसवू पाहतो. तर वालंबीलाही ''माडीवर जाऊन जाळं झटकायचं व्हतं. काशा ऱ्हाव द्या आजच्या दिस.''

असे म्हणून वालंबीलाही मजूरी द्यायला तयार होतो. हरणी वालंबीसारख्या गरीब दलित स्त्रिया गोपाळराव देशमुखाला भोगवस्तू वाटत राहतात त्याचा उपभोग घेण्यासाठी तो संधी शोधत राहतो. तळहातावर पोट भरणाऱ्या मांग समाजातील स्त्रियांना स्वातंत्र्यातही अशा प्रकारच्या अन्याय, अत्याचाराला सामोरे जावे लागते. शारीरिक, मानसिक कुचंबणा सहन करावी लागते. हरी जाधवाच्या शेतावर सरकी टोचण्यासाठी वालंबी बरोबर गेलेल्या हरणी, मंजी, आसरी, चतुरी व तीन मुलींना सकाळी दहा वाजल्यापासून दुपारी तीनपर्यंत तीन रुपये रोजाने राबवून घेतले जाते. मात्र दुपारी पाऊस कोसळल्यानंतर हरी जाधव काम बंद करायला सांगतो. व वालंबी बरोबरच्या दलित स्त्रियांना रोजगार ही दिला जात नाही. त्यांची फसवणूक केली जाते.

तर पायरुची मुलगी पद्मीला लग्नातील हुंड्याच्या दोनशे रुपयांसाठी सासूचा छळ सहन करावा लागतो. तिची सासू सखू पद्मीच्या आई वडिलांनी हुंड्याचे दोनशे रुपये दिले नाहीत म्हणून घराबाहेर पडवीत झोपायला सांगते आणि बाहेर पडणाऱ्या पावसात पद्मी भिजत राहते विनवणी करुन ही तिला पद्मीची दया येत नाही.

''आत्या व ऽऽ आत्याबाई ऽऽ !''

''काय ह्येव ऽऽ ? झोप न काढून मुकाट्यणानं.''

''वसरी गळून ऱ्हायली.''

''गळू दे, गळते तर.''

''येव द्या न व ऽ मले घरात.''

''घरात? आवऽऽत वसरीवरा पडू देतो तेच उपकार मान. आगलीचे दोनशे रु. घेऊन ये म्हणाव मायले. मंग झोपू देईन घरात.''[१७]

अशा सासूकडून होणाऱ्या त्रासात पद्मा दिवस काढत राहते पद्मीला माहेराहून यायला उशीर झाला म्हणून तिची सासू घरातून वेगळे काढते.

सुदामाची बायको मंजुळाला सुदामाच्या दारुच्या व्यवसनापायी संसारसुख लाभत नाही. छोटे कुटुंब असूनही दारुमुळे तिच्या संसारातील दारिद्रय हटत नाही

''चार हाताचे कष्ट दोन पोराले पुरुन उरत नाहीत ? पण पोटच भरेना. कस भरेन ? दारुच सुचू देयेना नवऱ्याले. दारुन कोणाचं भलं केले ? कव्हा कमले केल तरी ?''

हे तिचे मनोगत विचार करायला लावते. दारुमुळे अनेक स्त्रियांच्या संसारात दु:ख निर्माण झाले असून दारुचे व्यसन जडलेला सुदामा दारु पितच राहतो आणि एक दिवस घरीच दारु काढायला लागल्यावर पोलिसांकडून पकडला जातो.

अशा अनेक घटना प्रसंगातून नामदेव कांबळे यांनी दलित स्त्रियांच्याय दु:खाचे चित्रण धडविले आहे.

**मांग समाज – रुढी, परंपरा, अज्ञान :–**

दलित समाजात बऱ्याच वेळा अज्ञान, रुढी, परंपरेमुळेच दु:ख, दारिद्रयाचा जन्म होताना दिसतो. कादंबरीत मांग समाजात निर्माण झालेले दु:खाचे, दारिद्रयाचे प्रसंग अज्ञान, अंधश्रध्देमुळेच घडलेले आहेत

'उनसावली'मध्ये वामन भोजाजीच्या आईचा मृत्यूचा निरोप घेऊन गेलेला पायरु पूरातून वाचतो. मासे धरायला गेल्यावर पायरु, यसोंता, सीताराम सर्पदंशाच्या संकटातून वाचतात म्हणून पायरु अंधश्रध्देपोटी मरी आईचे गाडे ओढून नवस फेडतो. आणि कर्ज काढून देवधर्म केला जातो. अज्ञानामुळेच पायरुचा मृत्यू ओढावतो. आणि सावडण्याच्या प्रसंगी जेवण काय करायचे या रुढी परंपरेतून मांग समाजात संघर्ष उभा राहतो. एकुण काय तर रुढी परंपरा जोपासली जाते.

जन्म, लग्न, मृत्यू हे ग्रामीण जीवनातील महत्वाचे तीन प्रसंग. या प्रसंगातून लेखक 'सांजरंग' या कादंबरीत मांग समाजातील प्रथा, परंपरा, रुढींचे चित्रण केले आहे. वालंबीच्या अंतक्रियेच्या वेळी तिच्या प्रेतीला हात न लावणे, रघूच्या लग्नप्रसंगी भावकीने अडून राहणे, मोर नाचवणे, धोंडी मागण्यासाठी सीतारामला नागवे व्हावे लागणे, सूर वाजवणे, पोळ्या दिवशी बैल धरणे, करेच्या दिवशी भीक मागणे अशा पध्दतीने नामदेव कांबळे गावकीच्या अनेक रुढी प्रथा परंपरांचा मागोवा घेताना दिसतात.

**नामांतर लढा :-**

मराठवाडा विद्यापीठाला डॉ बाबसाहेब आंबेडकरांचे नाव मिळावे यासाठी दलितांनी प्रचंड आंदोलन केले. त्याचे पडसाद 'सांजरंग' या कादंबरीत उमटले आहेत. आंबेडकरी प्रेरणेतून दलितांची अस्मिता निर्माण होत गेली. मात्र या अस्मितेला विशिष्ट वर्गाकडून सर्व पातळीवर नकार मिळत गेला. याचा प्रत्यय नामांतर लढ्याच्या प्रकरणात सुध्दा येतो त्याचे चित्रण आपल्या कादंबरीत नामदेव कांबळेंनी केले आहे. औरंगाबाद इथल्या मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे अशी मागणी दलित संघटनांनी केली कारण बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्यात 'मिलिंद महाविद्यालयाची' स्थापना करुन शिक्षणाचे बीज रोवले होते. त्यांनी मराठवाडा ही आपली कर्मभूमी मानली होती अनेक थोर पुरुषांची नावे विद्यापीठांना दिली जातात. बाबासाहेब आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार असल्याने त्यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यावे अशी दलितांची मागणी होती. त्यातून कित्येक महिने मराठवाडाभर आंदोलने झाली. नामांतराची चळवळ उभी राहिली मात्र मराठवाडा हे नाव मराठवाडा जनतेच्या अस्मितेचे प्रतिक आहे, असे समजून त्याला विशिष्ट वर्गाकडून विरोध सहन करावा लागला.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरची मागणी घेऊन प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वाखाली नागपूर ते औरंगाबाद अशा लाँग मार्च जाणार असल्याची पत्रके भिंतीवर टपऱ्यावर झळकू लागतात. नामांतराच्या विषयाने रघूच्या मनात विचाराचे वादळ उठते. ''बाबासाहेबांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यायलाच हवे. सरकारने आपल्या भूमिकेवर ठाम असायला हवे. मराठवाड्यातील सवर्णानीही नामांतराला विरोध करायला नको.''[१८] असेच रघूला वाटत राहते लॉगमार्च मधील कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी काढलेल्या वर्गणीत तो पन्नास रुपायांची मदतही करतो. रघुला प्रश्न पडतो, 'महाराष्ट्राच्या दोन्ही सदनात नामांतराचा ठराव एकमताने पास करुन ही त्याची अंमलबजावणी करायला एवढा उशीर लागतो का ?''

या संदर्भात गंगाधर पानतावणे म्हणतात, ''दोन्ही सभागृहात विद्यापीठ नामांतराचा प्रस्ताव मंजूर होताच, गडगडाट झाला. मराठवाड्यात चक्र फिरले. औरंगाबादला बातमी येताच युवकांनी संताप व्यक्त केला. जे युवक कालपर्यंत नावाच्या बाजूने होते. ते ही भडकले. असे कसे झाले ? एका क्षणात सारा पालट कसा झाला ? काही समाजकंटक जे स्वत:ला समाजाचे उध्दारकर्ते म्हणवितात ते तर या पाठीशी

नव्हते. जे लोक दलितांच्या प्रश्नासंबंधी बेंबीच्या देठपासून बोलतात, त्यांनी तर हा सगळा खेळ केला नसेल! एकुण काय की, दलितांविषयी सहानुभूती, बौध्दांविषयी जिव्हाळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांविषयी प्रेम वगैरे सारे प्रकार कसे बेगडी होते. हे एका क्षणात कळून चुकले. एककडे बाबासाहेबासंबंधी आम्हांला अतीव आदर आहे, असे म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्या नावाला विरोध करायचा. केवढा हा दुटप्पीपणा. केवढा हा आत्मघातकी प्रकार.''[१९]

श्री. नामदेव कांबळेंनी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर प्रश्नाची कादंबरीत मांडणी करुन फुले, शाहू, आंबेडकरी महाराष्ट्राची दुटप्पी मानसिकता स्पष्ट केली आहे. नामांतराच्या घटनेमुळे अनेक ठिकाणच्या अजाण दलित गरीबावर अन्याय झाला जाळपोळ दंगे झाले. औरंगाबादला दगडफेक झाली. मोडतोड झाली. रस्ते अडविले गेले. अनेक निरपराध दलित मारले गेले. जाळले गेले. दलित वस्त्या पेटवल्या गेल्या. राजकारण्यांनी मतमतांचे राजकारण केले आणि सवर्ग व मागासवर्गीयात संघर्ष उभा झाला. एकीकडे बाबासाहेबासंबंधी आम्हांला अतीव आदर आहे, असे म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्या नावाला विरोध करायचा. ही मानसिकता नामांतराच्या घटनेने समोर आली होती.

या संदर्भात गंगाधर पानतावणे म्हणतात, ''असे सांगतात की, उस्मानाबादला नामांतराविरोधी मोर्चा निघाला तो ही बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून व पुतळ्याला हार घालून हे केवढे ढोंग.''[२०] या विधानातून गंगाधर पानतावणे यांनी उच्चवर्णीयांची विकृत मनोवृत्ती स्पष्ट केली आहे.

मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याच्या घटनेस सर्व विरोधकांचा विरोध पत्करुन त्यावेळेचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतर घडवून आणले त्याबद्दल आंबेडकरी विचारांचा संपूर्ण समाज त्यांच्या ऋणीच राहिला आहे. परंतु नामांतरासाठी किती मोठी आंदोलन करावी लागली, कित्येकांचे संसार उध्वस्त झाले, ते ही या देशाचा घटनाकार, जगात ज्याची गणना होत आहे अशा विद्वान पुरुषाचे नाव एका विद्यापीठाला देण्यासाठी काय काय घडले याचे प्रतिबिंब या 'सांजरंग' कादंबरी लेखनातून प्रतिबिंबित झाले आहे.

''गावोगावच्या लॉग मार्चची सरकारने हीच अवस्था केली. लोकांना एकत्र येऊ दिले. मुख्य रस्त्याला लागू दिले त्यांना झोडपून पांगवले नंतर नेत्यांची धरपकड सुरु केली. लॉगमार्च कृती समितीतील झाडून सगळ्यांना बंदीगृहात डांबले. बाबासाहेबांच्या नावासाठी निघालेल्या जनतेवर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याची व नेत्यांना तुरुंगात डांबल्याची वृत्ते वर्तमानपत्रातून उमटू लागली. त्यानेच गावोगावीची बाबासाहेबांना मानणारी जनता खवळली. त्यांना शिकवण्यासाठी सवर्ण उभे ठाकले. एकच आगडोंब उसळला सगळा मराठवाडा त्यात होरपळून निघाला.''[२१]

या संदर्भात 'शतकातील दलित विचार' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत शरणकुमार लिंबाळे म्हणतात, ''नामांतर चळवळीमुळे दलितांमध्ये मोठ्या प्रमाणात भावनिक ऐक्य निर्माण झाले. समतावादी चळवळ उभी राहिली. सर्वसामान्य माणूस मोठ्या संख्येने आंदोलनात उतरला. अनेक माणसे तुरुंगात गेली. नामांतरचा प्रश्न हा पँथर चळवळीचा प्राणबिंदू ठरला. नामांतराचा लढा जसा संघर्षाचा होता. तसा तो समाजप्रबोधनाचाही होता ''[२२]

विद्यापीठ नामांतर प्रसंगी दलित जनताही मागे हटली नाही. नामांतरासाठी दलित तरुणांनी आत्मदहन केले. सवर्णानी केलेल्या अन्याय अत्याचारापुढे नमून न जाता दलितांनी आपली मागणी सतत पुढे रेटली अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार केला.

**मांग–नवबौध्द धार्मिक वैचारिक संघर्ष :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळ उभी करुन शोषित पीडित दलित जनतेमध्ये होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुध्द जागृती निर्माण केली. त्या जागृतीचा परिणाम दलित वर्गात स्वाभिमान निर्माण होऊन अन्याय अत्याचाराविरुध्द जनआंदोलने झाली. त्यामुळे हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेला आणि वर्णव्यवस्थेला धक्के बसण्यास सुरुवात झाली परंतु या चळवळीतून शिकून सवरुन पुढे आलेल्या दलित वर्गाने ज्या वेगाने संघटना उभी करावयास हवी होती. त्या वेगाने संघटना बांधली गेली नाही. नव्याने जाग आलेले दलित शोषित शोषण मुक्तीसाठी लढाई लढू लागले. तसेच ते अंतर्गत स्वरुपातही लढताना दिसतात. ही लढाई मात्र तीव्र स्वरुपाची आहे व जीवघेणी आहे हा दलित समाज आज ही एकसंघ संघटित राहत नाही

तर, जातीय, धार्मिक व राजकीय क्षेत्रात गटातटात विभागला जाऊन आपआपसात लढत राहिला आहे.

नामदेव चं कांबळे यांनी 'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबऱ्यातून मांग समाजाच्या शोषणाबरोबरच शोषण मुक्तीच्या लढ्याचे चित्र रेखाटले आहे. नवबौध्द समाजाच्या मानाने उशीरा का होईना डॉ.आंबेडकरांचा आत्मोध्दाराचा विचार मातंग समाजाला पटलेला दिसतो. त्यांचा मानवमुक्तीचा विचार त्यांना हवाहवासा वाटू लागलेला जाणवतो हे स्पष्ट करताना, नामदेव कांबळे लिहितात, ''हळूहळू का होईना परंतु मांगाचीही अस्मिता जागी झाली. मेलेली गुरे ओढणे, कातडे सोलणे, त्यांचे मांस खाणे अमावश्या ग्रहण मागणे, उष्टावळ खाणे, डफडे वाजविणे, अशी व यासारखी निम्न दर्जाची कामे गावोगावी मांगाकडून टाकली जाऊ लागली. मांग पुढारी गावोगावी, खेड्यापाड्यात हिंडून मांगांना सुधारणेचे महत्व पटवून देऊ लागले.''[२३]

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतर चळवळींमुळे बौध्द झालेले पूर्वाश्रमीचे महार दलित आणि आपला स्वत:चा मांग समाज यांच्यातील फरक शिकलेल्या रघूला जाणवत राहतो. आंबेडकरांचे धर्मांतर हे दलित समाजाचा विचार करता, दलित चळवळीचे अत्यंत क्रांतीकारी पाऊल होते. विषमतेवर आधारलेल्या हिंदू धर्माचा त्यांनी १९५६ साली त्याग केला. मात्र बाबासाहेबांच्या बरोबर महार समाजाशिवाय इतर दलित समाजाने धर्मांतर केले नाही. त्यात मांग समाजाचाही उल्लेख करता येईल. या समाजात कै.अण्णा भाऊ साठे यांना आपली प्रेरणा मानून आपल्या समाजाला संघटित करण्यासाठी चळवळ उभारली. परंतु आंबेडकरांच्या धर्मांतरास त्यांनी उदात्त दृष्टीने पाहिले नाही. 'सांजरंग' कादंबरीच्या शेवटच्या भागात वसारीतील मांगलोक मांगांच्या गावकीचे प्रतिक ठरलेले डफडे गावात जाऊन फोडून टाकतात. मात्र नवबौध्दांच्याकडून धर्मांतराचा विषय निघताच माघार घेतात.

''पाहता पाहता ती वार्ता गावभर झाली. गावातील लोकांनी चावडीवर गर्दी केली. मांगांनी डफडी फोडली पहिला दगड पाहुण्याने टाकला मग प्रत्येकाने आपापल्या डफड्यावर दगड घातले गावकरी पाहतच राहिले.. बौध्दांना ही बातमी कळाली. ते ही आनंदले. कुंडलिक, वाघमारे मास्तर, गोपाळा, तुळशीराम कांबळे, राजाराम मांग वेटाळात आले. त्यांनी मांगाचे एकमुखी कौतुक केले. वाघमारे तर म्हणाला,

''आता बुध्द धर्मातच या तुम्ही ''

मांगांनी पाहुण्याकडे पाहिले.

''बुध्दधर्मात येणार नाही आम्ही.''

''आर बा ऽ हिंदू धर्मातील ही कामं टाकल्यावर तुम्ही त्या धर्मातच कसे काय ?''

''नसायला काय झाले ? कामे टाकलीत. आचार विचार मानसिकता टाकली थोडीच '' सिताराम म्हणाला.

''नाही बा. आम्ही बुध्द धर्मात यायचे नाही.'' बुग्या.

''आम्हीही येणार नाही ''

अनेक आवाज उमटले. बौध्द निराश होऊन परतले.''[२४]

मांग समाजाचा विचार करता हा समाज धर्मांतरापासून अलिप्त राहिल्याचे दिसते. यासंबंधी सोमवंशी बी. सी. म्हणतात, ''याचा परिणाम असा झाला की, मांग समाज पारंपारिक पध्दती व चालीरीतीली चिकटून राहिला. महारांनी टाकलेली गावकीची कामे तो आनंदाने करु लागला. स्वाभिमान गहाण ठेवून गावात अमावस्या व वसा मागत फिरु लागला. मात्र त्याच्याबरोबर असलेला महार समाज विकासाच्या दिशेने कुठल्या कुठे गेला ''[२५]

तसेच पुढे सोमवंशी बी. सी. आपल्या 'बौध्द धर्मीय मातंग' या पुस्तकात प्रा.लक्ष्मण ढोबळे यांचा मातंग समाजाबद्दलचा विचार व्यक्त करताना म्हणतात, '' आत्मपरिक्षण केले तर तोंडावर शेंदराचा लेप, कमरेला कवळाभर चिंध्या, हातात आसूड आणि पाठीवर वळाचे ढीग घेऊन आम्ही पोतराज झालो. स्वाभिमान गहाण ठेवून 'ग्रहणाचे दान' आणि वस मागत फिरलो. गळ्यात डफडे आणि काखेत झोळी घेऊन आयुष्य जाळत राहिलो. देवदेवतांच्या नादी मुरळी व देवदासी होऊन वासनेचे लिलाव करीत राहिलो. कष्टाच्या घामावर विश्वास न ठेवता रयतेचे भिकन महत्वाचे मानले. मदनाची रास सावकाराच्या दारात ओतून, सावकाराच्या विरोधकांचे मुंडके मारण्यात धन्यता मानली. फिरकी फिरवून दोन वळल्यावर पाटलाच्या वाड्यावर दाणे मिळत गेले आणि आपण फिरकी फिरवतच राहिले. मागे सरकत फिरकी फिरवावी लागते. ही सवय अंगवळणी पडून आपले मागे सरणे सर्वच क्षेत्रात कायम राहिले. आपण राज्यकर्त्यामधल्या आण्णा,

दादा, तात्या, नाना, यांच्याच मिरासदारीच्या गप्पा ऐकत ढेलजच्या पायरीवर विड्याचे थोटूक ओढत गाफील राहिलो. सत्ताधिशांच्या नादी लागून हुजऱ्याची पैदास करण्यापेक्षा युगपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत सामील झालो असतो तर, तालुका पातळीवर मांगांचा एखादा तहसिलदार तरी दिसला असता. आपण जर हे केले नाही तर उद्याचा सूर्य आपल्यावर थुंकल्याशिवाय राहणार नाही.''[२६]

या विचारातून प्रा.लक्ष्मण ढोबळे यांनी मांग समाजाच्या जीवनाबरोबर त्यांची वैचारिकता व मानसिकता स्पष्ट केली आहे. असे असले तरी नवविचाराने प्रेरित होऊन गावकीच्या कामातून दूर होऊ पाहणाऱ्या मातंगांना वसारीतील नवबौध्द हवी तेवढी मदत करायला तयार होत नाहीत. त्यांच्याही मनातून जातीयता नाहीशी झालेली नसते. बौध्द समाजात मदत मागायला गेलेल्या मांगांना कोणीही समजून घेत नाही. धर्मांतरीत मांगाच्या सबंधी सोमवंशी बी.सी. म्हणतात, ''धर्मातराचा विचार केल्यास मांग समाजाने धर्मांतराला पाठींबा दिला होता. पण त्यांनी धर्मांतर केले नाही. ज्यांनी त्यावेळी बाबासाहेबांबरोबर धर्मातर केले त्यांना चांगला अनुभव आला नाही. कारण मांग समाजांनी ही अशा धर्मांतरीत लोकांना जाती बहिष्कृत केले व महार लोकांनी ते मूळचे मांग म्हणून जवळ केले नाही. त्यामुळे या धर्मातरीत मांगांना त्यांच्या मुलामुलींच्या विवाहासंदर्भात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परिणामी त्यांना परत हिंदू मांग जातीत जाहीरपणे प्रवेश करावा लागला.''[२७] अशा प्रकारे जातीच्या कोंडीत अडकलेला मांग समाज धर्मांतरापासून दूर गेला हेच खरे. जात ही गोष्टच अशी आहे की, जी काही केल्या मनातून जात नाही. दि. रा. वाघमारे म्हणतात, ''ज्या दिवशी बौध्दांना आपले महारपण झटकता येईल त्यादिवशी खऱ्या अर्थाने बौध्द समाज इतर दलितेतरांना सामावून घेण्यासाठी पुढे येईल ''[२८] याचा अर्थ महारांनीही नवबौध्द् होऊन आपली जात विसरली नाही. धर्मांतर विषय बाजूला ठेवून विचार केला तर मातंग समाजात आजही संस्कृतीच्या नावावर प्रचंड अभाव व उणीव आहे. मातंग समाजाचे सांस्कृतिक जीवन अजूनही जुन्या रुढी परंपरावरच आधारीत आहे. परंपरावाद व जुन्या अंधश्रध्दा चालीरीतीचे अस्तित्व व जूनाट भावभावनांची मानसिकता जशीच्या तशीच आहे. मातंग समाजाचे समाजमन आजही काळानुरुप सामाजिक व सांस्कृतिक बदल स्विकारण्याच्या मन:स्थितीत नाही. याचे चित्रण लेखकाने या कादंबरीलेखनातून घडविले आहे. दलित समाजात जातीजातीत एक दुभंगले पण जाणवत आहे ते नष्ट होणे गरजेचे आहे.

**संघर्ष :-**

'उनसावली' व 'सांजरंग' या दोन कादंबऱ्यात संघर्षाचे चित्र रेखाटले आहे. मांग समाज आणि त्या समाजातील विविध पात्रे यांच्या संघर्ष विविध स्तरातून येताना दिसतो. भूक, वेदना, दारिद्रय, रीतीभाती, रुढीपरंपरा, या विरोधात लेखकाने नायकाला विविध पातळ्यावर संघर्षाच्या रुपाने उभा केला आहे.

या कादंबरीतील संघर्षाचा विचार करता या संघर्षाला अनेक स्तर प्राप्त झाले आहेत. वालंबीला आपल्या पती निधनानंतर एक दलित स्त्री या नात्याने आपल्या मुलांसाठी, घरासाठी दारिद्रयाशी संघर्ष करावा लागतो. हा पहिला स्तर, तर दुसरा स्तर म्हणजे रघुनाथला शिक्षण घेण्यासाठी करावा लागलेला संघर्ष तिसरा संघर्ष स्तर म्हणजे मांग जातीने त्यांच्या रीतीभातीसह, समाज अपसमजांसह प्राथमिक गरजापूर्तीसाठी, चातुवर्ण्य व्यवस्थेविरुध्द चालवलेला संघर्ष आणि नवबौध्द आणि मांग जातीला जातपातळीवर करावा लागलेला संघर्ष. असे संघर्षाचे अनेक स्तरीय चित्रण एकसंघपणे घडविण्यात कादंबरीकार यशस्वी झालेले आहेत. हे लेखकाचे यश अनुभवाच्या खोलीतून प्राप्त झाले आहे. त्यामुळे हे अनुभवविश्व जिवंत आणि रसरशीत वाटू लागते.

'उनसावली' 'सांजरंग' या कादंबरीतून मांग समाजाचे, मांग समाजातील विधवा वालंबीच्या जगण्या, भोगण्याचे व तिच्या कुटुंबाचे चित्रण घडले आहे. विदर्भामधल्या तालुक्याच्या गावापासून दूर असलेल्या 'वसारी' खेड्यात कादंबरीतील कथानक आकार घेत राहते. कळणू जाधवाच्या मृत्यूनंतर वालंबीला तीन मुले घेऊन एकटीला जीवन संघर्षाला सामोरे जावे लागते.

'सांजरंग' च्या प्रस्तावनेत विनय हर्डीकर म्हणतात, ''तीन मुले पदरात टाकून नवरा गेल्यानंतर त्या मुलांसाठी - त्यातल्या मुलग्यांच्या शिक्षणासाठी व मुलीच्या लग्नासाठी - जिद्दिने काबडकष्ट करणाऱ्या वालंबी या अशिक्षित असहाय्य मांग स्त्रीचे हे महाभारत आहे.''[२१] दलित समाजातल्या 'मांग' या अस्पृश्य जातीत जन्म घेतलेल्या वालंबीला वारसा हक्काने दारिद्रय, उपेक्षा, दलितपणच वाट्याला आले असते. अशी ही वालंबी आपली व आपल्या मुलांच्या पोटाची भूक भागवत त्यांना शिक्षण देण्यासाठी निकराचा संघर्ष करीत राहते तरीही आपले शील भ्रष्ट होऊ देत नाही तळहातावर पोट भरणाऱ्या दलितांच्या वाट्याला

येणारा संघर्ष वालंबीला सहन करावा लागला तरी ती आपल्या मुलांना महाविद्यालयीन शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत राहते.

या कादंबरीतील संघर्ष अनेक अंगांनी दृष्टीस येतो. मांग वेटाळाची ही कहाणी. गावकुसाबाहेरील मांग ही उपेक्षित जात. शिक्षणापासून वंचित, उत्पादन साधनापासून दूर , त्यात जोडीला अज्ञान, अंधश्रध्देचे थैमान, दारिद्रय, उपासमार यांच्याशी झगडत मांग जीवन जगत राहतात हे सर्व संघर्ष कळत न कळत वाचकाच्या मनाचा वेध घेतात व वाचकाला अंतर्मुख करतात.

रघू या कादंबऱ्यातील मध्यवर्ती व्यक्तीरेखा आहे. त्याच्या वाट्याला आलेला संघर्ष हा दलित समाजात जन्म घेतलेल्या व शिकू पाहणाऱ्या दलित तरुणाच्या वाट्याला येणारा संघर्ष आहे. एस एस.सी. पास झाल्यानंतर पुसदला शिक्षणासाठी गेल्यावर तेथे येणाऱ्या संघर्षाला त्याला सामोरे जावे लागते. अत्यंत हालअपेष्टात शिक्षण घेऊन तो समाजात उभा राहतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना एक मार्गदर्शक सूत्र दिले. ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.'' तेव्हा रघू शिकतो. भावाला शिकवतो आणि मातंगांनी शिकावे म्हणून अपेक्षा बाळगतो. मात्र आंबेडकरांची जयंती साजरी करण्यासाठी त्याला मातंग समाजाबरोबर संघर्ष करावा लागतो.

'सांजरंग' मध्ये तर नव्याने जाग आलेल्या, प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मांग समाजाला गावकी सोडण्याच्या प्रसंगी वेगळ्याच संघर्षाला सामोरे जावे लागते. गावातील लोक त्यांच्यावर बहिष्कार टाकतात. त्यातून निर्माण झालेला जीवन संघर्ष कादंबरीकाराने चित्रित केला आहे.

> ''यादव तुझ्या चक्कीवर मांगायची दळणं दळू नोको आजपासून.''
>
> ''मामा, तुम्हीबी दुकानचं वाण देवू नका त्याह्याले.''
>
> ''वावरातली कामधामं बी बंद केली पाहिजे त्याह्याची.''
>
> ''हो, हो उद्यापासून त्याह्यचं काम बी बंद करा ''[३०]

अशा प्रकारे मांग समाजावर सवर्णाकडून बहिष्कार टाकण्यात येतो. त्यातून त्यांच्या वाट्याला जीवघेणा संघर्ष येतो.

मांग व महार या दोन्ही दलित समाजातील जाती. या दोन्ही जातीतील मांग व नवबौध्द यांच्यातील धर्म पातळीवर होणारा वैचारिक संघर्ष कादंबरीकाराने यशस्वीपणे टिपला आहे. दलित एकमेकांना आपले मानत नाहीत. मग ते महार असोत, मांग असोत, नाहीतर चांभार असोत. एक दुसऱ्याला नीच समजतो. हा दलित समाजातील संघर्ष अंतर्गत तणावाला कारणीभूत ठरतो.

**संवाद :-**

कादंबरीतील संवाद हा घटक मानवी मनाचे दर्शन घडवित असतो. त्या दृष्टीने संवादाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

नामदेव चं कांबळे यांच्या 'उनसावली' आणि 'सांजरंग' या दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. यातील माणसे बेरकी, तापट, स्वार्थी अशा वेगवेगळ्या कंगोऱ्याची आहेत. या कादंबरीतील संवाद स्वाभाविकपणे त्या त्या पात्रांच्या तोंडी आलेले आहेत. या कादंबऱ्यात सुशिक्षित पांढरपेशी कमी तर अज्ञानी दलित व्यक्तिरेखा अधिक आहेत या कादंबरीतील प्रत्येक व्यक्तिरेखा ही कादंबरीकाराच्या लेखणीतून सजीव उतरली आहे. लेखकाच्या लेखणीतून 'वसारी' गावातील दलित समाज त्यांची अविकसित मने, जातीयता, श्रेष्ठ कनिष्ठता भेद, वेगवेगळ्या स्वभावाची माणसे, त्यांचे वागणे संवादातून व्यक्त झाले आहे. हे संवाद अत्यंत साधे व बोलके आहेत. खऱ्या अर्थाने विचार केला तर दोन्ही कादंबरीमधील संवादाला कमालीची वास्तवपूर्णता प्राप्त झालेली आहे. काही संवाद मांग लोकांच्या बोलीभाषेत असल्याने मांग लोकांच्या परिस्थितीचे यथातथ्य चित्रण घडले आहे. त्यामुळेच 'उनसासवली' व 'सांजरंग' या दोन्ही कादंबरीतील व्यक्तिरेखा आकर्षक व बोलक्या झाल्या आहेत कादंबरीकाराने केवळ संवादातून व्यक्तिरेखा भोवतालची पार्श्वभूमी ठसठशीतपणे उभी केली आहे.

या कादंबऱ्यातील संवादामध्ये दोन स्तरीय भाषा आहे. उच्चवर्णीयांची शुध्द भाषा, दलितांची वसारी भागातील भाषा कादंबरीच्या संवादातून लक्षात येते. या कादंबरीतील संवाद पात्रांच्या तोंडी आल्यामुळे त्यात स्वाभाविकता आली आहे. तसेच या कादंबरीतील संवादातून व्यक्तिरेखांचे स्वभावधर्म, दलित समाजाचे श्रेष्ठ कनिष्ठता व्यक्त करणारे संवाद कादंबरीत येतात. कादंबऱ्यातील सर्वच संवाद सहज, सरळ, बोलके आणि मनाला भिडणारे आहेत.

'सांजरंग' कादंबरीत स्वत:च्या जातीधर्माचा कडवा अभिमान मांग समाजातील व्यक्तींच्या संवादातून व्यक्त झाला आहे.

''आता बुध्द धर्मातच या तुम्ही.''

मांगांनी पाहुण्याकडे पाहिले.

''बुध्द धर्मात येणार नाही आम्ही.''

आर बा ऽ, हिंदू धर्मातील ही कामं टाकल्यावर तुम्ही त्या धर्मात कसे काय ?

''नसायला काय झाले ? कामे टाकलीत, आचार विचार मानसिकता टाकली थोडीच.'' सिताराम म्हणाला.

''नाही बा आम्ही बुध्द धर्मात यायचो नाही.'' बुग्या.

''आम्हीही येणार नाही.''

अनेक आवाज उमटले.''[३१]

'सांजरंग' मधील वालंबीच्या मृत्यूनंतर वालंबीच्या प्रेताला न जाण्याच्या भूमिकेतून मांगांनी घेतलेला पवित्र त्यांच्याच संवादातून व्यक्त होतो. रघुनाथ आपल्या भावकीजवळ येऊन विनवणी करु लागतो. तेव्हा संवाद घडतो.

''लहाने बापू, आटोपा ना आता. झाली आमची सगळी तयारी.''

''आपून नाही त्याच्यात.''

त्याने कानांवर हात ठेवले.

''चला न शिवरामबापू ?''

''नाही बा.''

तसाच तो पुढे गेला. रस्त्यात बसलेला गणपत, मारोती, कचऱ्या व इतरांजवळ थांबला

''चला न हो आटोपा न.''

''ह्ये न बुगाजी. त्याले म्हण नं. तुझ्या चुलत्याच्या घरी बी ह्येत दोघं तिघं.'' गणपत म्हणाला.

''तुम्ही चला न पण ''

''नाही, म्हण त्याह्यलेच.''

''काय करावे आता ? भाऊबंद हात बांधून बसलेत. त्यांचेशिवाय होतही तर नाही ''

''तुम्ही काही बी म्हणा गडे हो. पण आपल्याले गमेना यात.'' मारत्या इतरांकडे पहात म्हणाला.

''गमेना तुले ?'' गणपत.

''हो न रे सुद दिसते का हे ? आपलीच नामुस्की ह्ये न यात ''

''आसू दे.''

''यसोंताले परबीबंद आसून बी माह्या पोरीच्या लग्नात वालबी भाबी आलती. आपून जातो बा.''

''त्या यसोंताचं कसं मग ?''

''त्याचं काय नाही करायचं मले.''

''हो न रे. माझ्या जमनीची बी तिनंच सुटका केली व्हती. बाळातपणात ती नसती तर आली तर मेली आसती न पोरगी माही तिनं पाह्यलं का येवढ्या तेवढ्यात ? तिचीच मयत आपून सडू घालायची? आपल्याले बी पटेना हे.''

''आर ऽऽ पण.''

''चाललो मी.''

तो उठला. त्याचे पाहून मारत्याही उठला.

हरणीच्या घराजवळच्या बोळीतून चतुरी आली. वालंबीचे घराकडे गेली. बुग्याने रागाने तिच्या कडे पाहिले. पुटपुटला,

''मायची त्त, कामधामं नाहीत का या आऊले घरी?''

कचऱ्या व मारत्या तिथंवर आले. बुग्याजवळून पुढे निघाले. त्याने विचारले,

कुठी चाल्ले रे ?

''आपून नाही बा तुमच्यात''. कचऱ्या.

''पाह्य बा. इचार कर.''

''काय ह्ये रे बुग्या दा?''

जगदीशचा भाऊ वालंबीला पाहून परतत होता. त्याने विचारले

''काय नाहीँ. एऱ्हीच.''

''मारती दा, काय भानगड ह्ये.''

''काय नाही हो. वालंबा माबीले हात लावायचा नाही म्हंतात.''

''काहून रे बुगाजी ?'' नुकताच आलेला वाणी म्हणाला.

''ती आमची भावकीची भानगड ह्ये तात्या.''

''हीच वेळ ह्येका बे लेक हो भावकी भावकी म्हणून नाचायले ?''

''कशाची फोकण्याची सुधारणा करता बे ? मेल्या माणसाले सडू घालता. ही सुधारणा ह्ये का?''[३२]

'उनसावली' मध्ये स्वत:च्या जातीधर्माचा कडवा अभिमान मांग समाज कसा दाखवतो त्याचे चित्रण पुढील संवादातून दिसून येते.

''काय ह्ये रे?''

''कुठे काय आहे ? पाने आहेत आंब्याची.''

''ते तर दिसते मले बी. कशाले आणले पण ?''

''तोरणासाठी.''

'' ऑ ऽऽ भीमजयंतीच तोरण लावतं घराले ?''

तेवढ्यातच शिवऱ्या गावातून लगबगीने आला म्हणाला,

''चाल रे बुग्या दा. लोक वाट पाह्यलेत तिकडं.''

''आरे पण ह्यो रघ्या काय म्हंते ऐकलं का ?''

''काय?''

''भीमजयंतीच तोरण लावतो म्हंते.''

''खरं रे?''

''काय झाले मग?''

काय झाले ? तू तोरणच लाव फक्सत. मग समजन तुले?''

''लावतो न.''

''काय कलकल ह्ये रे ?''

पुंज्या बाहेर डोकावला. कचऱ्याही आला.

''ऐकलं का रे ! भीमजयंतीच तोरण लावतो म्हंते रघ्या .'' बुग्या.

''शिकला म्हून लय शाना झाला का, बाबू ?'' पुंज्या

''बुध्द धर्मातच जाय न सुदा सर्का.'' कचऱ्या.

''लाव द्या रे तोरण त्यायले. मग पाहू काय करायचं ते.''[३३]

**वालंबीचा मनाशी संवाद :-**

नामदेव चं. कांबळे यांच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबरीमधील एक महत्वपूर्ण व्यक्तिरेखा म्हणजे वालंबी. आपल्या पतीच्या मृत्यूनंतर ही वालंबी एकाकी जीवन जगत असते. तरीही एकांतात कळणूशी संवाद साधत असते. अशी सुखदु:खाच्या प्रसंगी अनेक स्वगत या कादंबरीतून अनेक ठिकाणी आली आहेत. ह्या स्वगतांमुळे वालंबीची व्यक्तिरेखा खूपच उजळून निघाली आहे. वालंबीच्या मनातील तगमग, वालंबीच्या मनातली कळणू विषयीची ओढ वालंबीच्या मनातला स्वप्नाळूपणा, तिची मानसिकता ह्या साऱ्या मनोवृत्तीचे चित्रण कांबळे यांनी बोलीभाषेतून पकडले आहे. ह्या स्वगतातूनच वालंबीचे भावविश्व साकार झाले आहे. आणि कथानक गतिमान होते.

वालंबीच्या दोन्ही सुना गरोदर असतात. रघू व सिताराम दोन्ही मुलं कमाई करु लागलेली असतात. गावानं आपल्या मुलांना चांगलं म्हणाव ही तिची अपेक्षा पूर्ण झालेली असते वालंबीने मनात ठरवले ते ते तिला सगळे मिळाले म्हणून ती सुखावलेली असते. मोहरुन गेलेली असते. अशी ही वालंबी स्वत:च स्वत:शी बोलू लागते.

''पाहा बरं, सुदं नाही का झालं? दोघी जावायले संगभरंच दिस ऱ्हायले. संबंमरचं बाळातीन बी व्हतीन आता. नातू व्हईल आता. एक तरी व्हईलच. कळणू मांगाचा इस्तार वाढन का नाही आता ? काय? मांग म्हणू नोको ! काय़ म्हणू मग ! तुम्ही नव्हते म्हणत मांगीन आली का रे पोऱ्ह हो ? मांगीन कुठी गेली रे ? म्हून. पाह्य माय. खरंच नव ऽऽ तुम्ही आता सायबाचे बाप झाले नं सवय पड्ली न, म्हणून म्हणली.''[३४]

दोन्ही मुलं कमावती झाल्यावर वालंबी वसारीला नवीन घर बांधायला काढते. एका महिन्यात घर तयार होते. घराची वास्तूशांत केली जाते. संध्याकाळचे जेवण झाल्यावर वालंबी अंथरुणात पडते पण तिला झोप येत नाही. सारखी नवऱ्याची आठवण येत राहते. अशा वेळी ही वालंबी स्वत:च स्वत:शी बोलू लागते.

''लेकराचा बाप आसता तर ? हे सुख त्याह्यच्या बी वाट्याले आलं असतं तर?''[३५]

असा प्रश्न तिच्या मनात येताच तिचे सांत्वन करण्यासाठी कळणू येतो.

''ऐ पिसे ऽ! का हून लडतं ? सुखाशिरी लडत असतात का ? काय करु मंग ? सुखाचा दिवस दिसला पण तुम्ही कुठी ह्ये माझ्यापाशी. होना घरात, माझ्यापशीच आसता तुम्ही. पण दुख दोघायनं येचलं. सुख बसली मी एकटीच पाखडत. होव ऽऽ . दुख आपल आपल्याले सुख वाटव जगाले. खरं ह्ये तुमचं. पण जत्रात माह्या हिती पिरतीचं माणूस आसाव व्हतं कानी ? ह्येत न. लेकरं ह्येत. सुना ह्येत. नातु ह्येत. कौसाबी ह्ये. तरीबी तुम्ही आसाच पाह्यजे व्हते. लेकरानं माहं दर्शन घेतलं. म्या तुमचं घेतले असंत. तुम्ही मायेनं माह्या डोक्शावर हात ठुला असता, तव्हा तुमच्या हातात, तुमच्या नदरत माहा आक्सा जीव म्या मिटून टाकला असता. हो, खरं ह्ये तुमचं. तुम्ही माह्यापशीच ह्ये. नाही म्हंतो का मी. काय ? झोपू आता? नका न. मले झोप येयेना. बसा न तुम्ही बी?''[३६]

अशा प्रकारे आयुष्यातील विशेष प्रसंगी आपल्या मृत पतीशी काल्पनिक संवाद आठवणीच्या रुपाने वालंबी साधण्याचा प्रयत्न करते.

**भाषाशैली :–**

नामदेव चं. कांबळे यांच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन्ही कादंबरीची भाषा वऱ्हाडी बोलीभाषा असून आशयाशी एकजीव झालेली दिसून येते. या दोन्ही कादंबरीतील भाषा पात्रानुरुप व प्रसंगानुरुप आहे. भाषेच्या स्वरुपाची आणि सामर्थ्यांची जाणीव कांबळे यांना चांगलीच आहे हे त्यांच्या भाषाशैलीवरुन जाणवते. तिच्यात कृत्रिमता बिलकूल नाही.

या कादंबरीतील भाषे संदर्भात दत्ता भगत म्हणतात, ''अशा या कादंबरीची भाषा मराठी साहित्यालाही समृध्द करीत नेईल एवढी समर्थ आहे. 'धग' या कादंबरीनंतर वैदर्भी बोलीचा इतका चांगला आविष्कार अन्य कुठल्याही लेखनकृतीत एवढ्या प्रभावीपणे झालेला आहे असे आढळून येत नाही.''[३७]

शरीराच्या भूकेचे वर्णन कादंबरीकाराने अतिशय सूचक अशा बोलीतून व्यक्त केले आहे. कुठेही भडक बटबटीत वर्णन घडविले नाही. ''हरणी सकाळीच उठली. पायरु तिच्या आधीच उठला होता. परंतु वाकळीत आतच पडून होता. तिने त्याच्या अंथरुणाकडे पाहिजे. तो टक्क जागा असल्याचे पाहून ती ओठातल्या ओठात हसली. तोही हसला. रात्री पावसाच्या सरींनी दोघेही चिंब भिजल्याने तृप्त होते.'' अशा सूचक शब्दात हरणी-पायरुचे संबंध लेखकाने मांडले आहेत

तर पावसाळी दिवसांचे वर्णन कादंबरीकाराने ग्रामीण भाषाशैलीत चित्रित केले आहे. ''पावसाळ्याचे दिवस. पाऊस नेहमीपेक्षा जास्त बरसू लागला. नेमाने, जोमाने बरसू लागला. त्यातल्या त्यात पुनर्वसू नक्षत्राने तर कहरच केला दररोज सकाळी नाही तर संध्याकाळी पाऊस येऊ लागला. दोन दिवसांपासून तर रात्रभर ढगांचा गडगडाट होऊ लागायचा. विजा चमकायच्या. दिवस निघेपर्यंत पाऊस लहान-मोठ्या धारांनी कोसळू लागायचा.

दिवस निघाला. सूर्याने जणू कडा बदलून आळस झाकला. त्याच्या अंगातून निघणारा प्रकाश, तेजस्वी प्रकाश कनवाळू होऊन ढगावर पडला. त्यांनी ही तो पार आत पोटात साठवला. आणि तृप्त होऊन रडणे विव्हळणे बंद केले. पाऊस थांबला तरीही वातावरणात कमालीचा गारठा होता.''[३८]

मांग समाजातील सुरुप आणि कुरुप दोन्हीची मांडणी करणाऱ्या या दोन्ही कादंबरीत बोलीभाषेचा उपयोग फक्त अशिक्षित व्यक्तींच्या संवादापुरता केलेला आहे. वालंबीची स्वगतांची भाषा आणि संवादाची भाषा वऱ्हाडातील वैशिष्ट्यपूर्ण भाषिक रुपांनी आणि वाक्प्रचार व म्हणींनी वास्तव पातळीवर व्यक्त झाली आहे. वालंबी आणि हरणी या दोघीतला संवाद बोलीचे दर्शन घडवतो.

''हरणी वालंबीच्या घरात टेकल म्हणाली, ''बरं केल माय. काय नाही व ऽऽ काल पासून दमच नाही जसा माह्या जीवाले. बाहिरच्याले जाऊन ऱ्हायली मी घडी घडी ''

म्हणत वालंबीने पोते अंथरले. खुंटीला टांगलेली गोडेतेलाची शिशि काढली. पोत्यावर पडून तिने कमरेच्या कशाची दीड गाठ मोकळी केली. हरणीने हातावर तेल घेतले. वालंबीच्या पोटाला लावले. उजव्या हाताच्या चार बोटांनी दाब देऊन तिचे पोट चाचपडून पाहिले.

''गाठ गेली न व ऽऽ नळाखाली.''

''म्हणूनच व ऽऽ झोंब येऊन ऱ्हायली पोटाले.''[३९]

कादंबरीतून शरीराच्या भूकेच्या सर्व मागण्या अतिशय सूचक बोलीत व्यक्त होतात. वैध शरीरसंबंधातील उत्कटता व आक्रमकता शब्दात व्यक्त करणे शिष्टाचार आणि संकेताविरुध्द हे ग्रामीण जीवनातील वास्तव कादंबरीतून अनेक प्रसंगातून आले आहे अशा सर्व ठिकाणी लेखक आपल्या शैलीचा वापर लोभसवाणा आहे. नंदाचा सून म्हणून स्विकार करण्यापूर्वी वालंबी थोडी शंकीत झाली आहे. शिकलेल्या मुलीच्या वागण्याने आपले प्रेमळ घर फुटेल असे तिच्या मनाचे स्पंदन लेखक नोंदवतो. ते असे , ''माझ्या लेकरासाठी कशीबी असली आऊ तरी पोटात घालून हुइन मी. सोन्यासाठी गू चिवडायची वेळ आली तरी चिवडीन मी. मग कस फूटन घर?''[४०]

'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबरीतील दुय्यम पात्रे पायरु, कौसा, हरणी मनाशी बोल असताना, स्वत:च स्वत:ची समजूत घालत असताना काव्यात्मकतेचा प्रत्यय येतो

**वाक्प्रचार, म्हणी :-**

'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबरीतून वैदर्भीय भाषेचा गोडवा, म्हणी, वाक्प्रचार व शब्दांतून व्यक्त होते

'सुताने स्वर्ग गाठणे.' या सारख्या वाकप्रचाराबरोबर 'आडली गाय काटे खाय', 'हाथ चले अपने भार कुत्ते भौंके हजार', अति झाले आणि हसू आले', 'खरुजच्या कुत्र्याची दोन दिवसच वचवच', 'माणसानं दिलेले पुरत ऱ्हाय, देवान दिलेले सरत ऱ्हाय', 'हातात तुरी भटभटणीला मारी', 'जव्हाचे गहू तव्हाचेय मांडे', 'अंथरुन बघून पाय पसरावे', 'आपली चाल पासली पाड', 'ज्याची खोडं त्याले गोडं', 'कानामागून आला नि शाणा झाला', 'दगडापेक्षा वीट मऊ', 'मोडेन पण वाकणार नाही', 'सगळे मुसळ केरात' इ. म्हणी आढळून येतात.

तर मायचित्त, सडकी रांड, कावरली कुत्री, खाणा खराबा, घुबडी, फडक चाट्या, सुकाळीच्या, रगत वरप्या, रांडमुंड बाई माणूस, रांडा सांड्याचे लेकरं, आगजाळपणा, हंडकीचे इ खास बोली भाषेत वापरले जाणारे शिव्यांचा वापर या कादंबरीतून आढळतो.

या कादंबरी लेखनातून वैदर्भीय भाषेतील गोडवा, वाक्प्रचार आणि शब्दसंपत्ती यांचे मनोहारी दर्शन पानोपानी होत राहते

**मांग बोली :-**

ग्रामीण भागातल्या मांग कुटुंबियांची एक खास भाषा असते. भटक्या विमुक्तांच्यामध्ये गुप्त आणि सांकेतिक बोलीचा वापर केला जातो तसाच मांग समाजात मांग बोलीचा वापर केला जातो. प्रस्तूत कादंबऱ्यात मांग बोलीचा वापर दिसून येतो. आंबूस (मांग), निरमा (पाणी), किटा (दारु), तुलगा (मुलगा), तुलगी (मुलगी), सोंबडीण (परकी बाई), निभळणे (निसटणे, पळणे), वायकर (काहीकर), चरवी लावतो (चुरुचुरु बोलणे), पिंगळ पिचकाटून टाक (काम विस्कटून टाक) असे मांग भाषेतील शब्द मराठीत पर्याय म्हणून वापरतात. मांग स्वत:च्या या भाषेला 'पारशी' म्हणतात.

या मांग बोली बाबत दत्ता भगत लिहितात, ''ही बोलीभाषा ग्रामीण भागातल्या मांग कुटुंबियांची आहे अनेक ठिकाणी त्या भाषेतील इडियम ही तर खास मांग कुटुंबियांची आहे ''[४१]

**ओवी :-**

''माहा बंधुराजा, त्याचं आभाळावाणी मन ।
संमधी पिरथवीच देली, त्याले देवानं आंदण ॥'' (पृ.२४०, सांजरंग)
''पाठच्या बंधुराया, तुही दुबळी बहिण ऽऽ
चांद सूर्यावाणी पण, माहं लेक ह्येत दोनं
पाठच्या बंधुराया, तुहं समिंदर मन ऽऽ
तुही आभाळाची माया, मह्या जीवाच राखनं ऽऽ '' (पृ.१५८, उनसावली)

वरील प्रकारच्या म्हणी वाक्प्रचार आणि शब्द यांचा लेखकाने योग्य उपयोग केल्यामुळे भाषेला एक वेगळे रुप प्राप्त झाले आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक भाषेचा स्वतंत्र घाट असतो त्याप्रमाणे प्रत्येक लेखनाची शैली स्वतंत्र असते. 'वसारी' परिसरातील मांग समाजाची जी बोली बोलली जाते. त्या भाषेचा वापर लेखकाने अनेक ठिकाणी केला आहे. तसेच सुशिक्षित उच्चवर्णीयांची शुध्द मराठी भाषा या कादंबरीत दिसते.

वरील सर्व वैशिष्ट्यांमुळे नामदेव कांबळे यांची भाषाशैली दलित, ग्रामीण जीवन चित्रित करण्यात समर्थ असलेली दिसते. या कादंबरीच्या भाषेत येणारे नवीन वाक्प्रचार, शब्द, प्रसंगानुरुप म्हणी, ओवी अशा भाषेच्या लवचिक स्वरुपामुळे दलित कादंबरीला तिचा सूर सापडला आहे.

## संदर्भ सूची

१) उनसावली , देशमुख आणि कंपनी प्रकाशन, ४७३, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०, आवृत्ती पहिली, पृ. १३ (मनोगत)

२) किशोर सानप, 'अनुष्टुभ', जानेवारी-फेब्रुवारी, २०००, पृ.४२

३) प्रा.बापट-गोडबोले, 'मराठी कादंबरी · तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी - सप्टेंबर १९७३, पृ.५९

४) उनि, पृ.५९

५) 'मुशाफिरी', डॉ. आशा सावदेकर, दै लोकसत्ता , नागपूर, वैदर्भिय कादंबरीचा आलेख

६) 'उनसावली', पृष्ठ क्रं.३१, ३२

७) उनि.पृ.१४०

८) उनि. पृ.२२५

९) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', श्री विद्या प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी, नोव्हेंबर २०००.

१०) 'अनुष्टुभ', जाने-फेब्रुवारी २०००, 'नामदेव कांबळे' च्या कादंबऱ्या, पृ.४३

११) उनसावली, पृ.

१२) उनि.पृ.

१३) उनि.पृ.९

१४) उनि, पृ.

१५) उनि. पृ.१७६

१६) प्रतिष्ठान , नोव्हेंबर, डिसेंबर १९९८ - राघववेळ उनसावली आणि सांजरंग आकलनाची एक वेगळी वाट, दत्ता भगत, पृ.५४

१७) उनसावली, पृ.

१८) सांजरंग, ले.नामदेव चं. कांबळे, आवृत्ती पहिली, १९९९, देशमुख आणि कंपनी, पृ.१५८

१९) प्रबोधनाच्या दिशा, गंगाधर पानतावणे, पृष्ठ क्रं.७७

२०) उ.नि.पृ.

२१) सांजरंग, पृ.१६०-१६१

२२) शतकातील दलित विचार, शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन प्रा लि. पुणे, प्रथमावृत्ती - १५ जुलै २००१, पृ.

२३) सांजरंग, पृ. क्रं.

२४) उनि.पृ.

२५) बौध्द धर्मीय मातंग (काल, आज आणि उद्या), प्रा.सोमवंशी बी.सी., आनंद प्रकाशन, जयसिंगपूरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, ११ मे १९९८

२६) उनि पृ.

२७) उनि.पृ.

२८) आंबेडकरी धम्म एक आकलन, दि.रा.वाघमारे, निर्मल प्रकाशन, नांदेड, आवृत्ती प्रथम, १४ एप्रिल १९९५, पृ.

२९) सांजरंग, प्रस्तावना - विनय हर्डीकर, पृ.११

३०) सांजरंग, पृ.२३९

३१) उनि. पृ.

३२) उनि. पृ. २७७-२७८

३३) उनसावली पृ.२१८, २१९

३४) उनि.पृ.

३५) उनि.पृ.

३६) उनि.पृ.

३७) प्रतिष्ठान, नोव्हेंबर / डिसेंबर १९९८, पृ.५१

३८) उनसावली, पृ ५६

३९) उनि. पृ.६-७

४०) सांजरंग, पृ.

४१) प्रतिष्ठान, नोव्हेंबर / डिसेंबर १९९८, पृ.५१